




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २४३ * नांदेड * शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## भोकरजवळ मॅजिक ऑटो-ट्रकचा भीषण अपघात, सहा ठार

### पोळ्याच्या दिवशीच सिताखंडी घाटात मृत्यूचा सापळा; पती-पत्नीचा समावेश

**भोकर (प्रतिनिधी)–** नांदेड-भोकर महामार्गावरील वाकद येथील सिताखंडी घाटातील धोकादायक वळणावर मॅजिक ऑटो आणि मालवाहू ट्रकची समोरासमोर भीषण धडक झाली. यात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात गुरुवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडला. जखमींना भोकर आणि नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी



दाखल करण्यात आले आहे.

मॅजिक ऑटो (क्र. एमएच २६ एके ०५४८) नांदेडहून अवैध प्रवासी वाहतूक करत भोकरकडे येत होते, तर ट्रक (क्र. ए.पी. २९ टी.ए. ८१२९) भोकरहून भरधाव वेगाने नांदेडकडे जात होता. घाटातील वळणावर दोन्ही वाहनांची जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की मॅजिकचा अक्षरशः चक्काचूर झाला. पोळा सणाच्या दिवशीच ही दुर्दैवी घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मृतांमध्ये सय्यद अल्तमश सय्यद अलीमोद्दीन (बिलाल नगर, भोकर), शेख फेरोज (सय्यद नगर, भोकर), पांडुरंग लिंगू वाघमारे आणि त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई वाघमारे (सय्यद नगर), बलवान पवार (पोटा तांडा) यांचा समावेश आहे. एका मृताची ओळख अद्याप पटलेली नाही.

जखमींमध्ये बसुमिया शेख ताजूमिया (कागज नगर), शेख खलील शेख वजीर (पान ३ वर...)

भोकर महामार्गावरील वाकद गावाजवळ, सिताखंडी येथे भरधाव ट्रक आणि मॅजिक ऑटोची भीषण धडक होऊन झालेल्या अपघाताबद्दल माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि या भागाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेतील जखमींवर तातडीने आवश्यक ते सर्व उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाला दिले आहेत. अपघातातील जखमींच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून उपचारात कोणतीही हयगय होऊ नये, अशा सूचनाही त्यांनी प्रशासनाला केल्या आहेत. या अपघाताची माहिती मिळताच खा. अशोकराव चव्हाण तत्काळ भोकरकडे रवाना झाले होते.


## उमरीत वाळू माफियांचा पोलिसांवर हल्ला

### डीवायएसपी पानेगावकर यांच्यासह कर्मचारी जखमी; येळेगावात तणाव, अतिरिक्त बंदोबस्त तैनात

**नांदेड (प्रतिनिधी) –** उमरी तालुक्यातील येळेगाव वाळू घाटात अवैधरित्या वाळू उपसा सुरू असल्याची गुप्त माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठांनी बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी डीवायएसपी शाम पानेगावकर यांच्या पथकाला तात्काळ घाटावर धाड टाकण्याचे आदेश दिले.

आदेशानुसार पथक गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी दुपारी येळेगाव घाटावर कारवाईसाठी पोहोचले असता, घाटावर उपस्थित असलेल्या वाळू तस्करांनी आणि त्यांच्या साथीदारांनी अचानक पोलीस पथकावर हल्ला चढवला. या हल्ल्यात डीवायएसपी पानेगावकर यांच्यासह पथकातील काही कर्मचारी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

जखमींना तात्काळ नायगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर येळेगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेबाबत अद्याप उमरी पोलीस ठाण्यात कोणतीही अधिकृत नोंद करण्यात आलेली नाही.



## दीड महिन्यांचा पावसाचा खंड, नांदेड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा

### आ.राजूरकरांसह महापौरांच्या शिष्टमंडळाने घेतली महसूल मंत्र्यांची भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** पावसाने सलग दीड महिन्यापासून दडी मारल्याने नांदेड जिल्ह्यातील खरीप हंगाम संकटाच्या छायेत आला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत सोयाबीन, तूर, कापूस आणि हळद या प्रमुख पिकांवर करपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून नांदेड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी भाजपा महानगराध्यक्ष तथा आ. अमरनाथ राजूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यंदाच्या पावसाळ्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. त्यातच गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली. मात्र, त्यानंतर दीर्घकाळ (पान ३ वर...)



**अर्धापूर :** अर्धापूर तालुक्यातील बारसगाव येथे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी बैलपोळा सण शेतकऱ्यांसमवेत साजरा केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, शिवसेना नांदेड तालुका प्रमुख सुनील कदम आदीसह शेतकरी बांधव दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# साक्षरतेचा आकडा वाढला; आता 'शिकलेपण' वाढवा!

महाराष्ट्राची साक्षरता ८७.३ टक्क्यांवर पोहोचली, पुरुष-महिला साक्षरतेतील दरी कमी झाली आणि महिला साक्षरतेत लक्षणीय वाढ झाली, ही निश्चितच समाधानाची आणि अभिमानाची बाब आहे. शिक्षणाचा प्रसार ग्रामीण आणि दुर्गम भागापर्यंत पोहोचत असल्याचे हे संकेत आहेत. विशेषतः महिलांच्या साक्षरतेतील वाढ ही सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाची खूण मानावी लागेल. मात्र, साक्षरतेचा टक्का वाढला म्हणून महाराष्ट्राने शिक्षणाचे उद्दिष्ट गाठले असे समजण्याची चूक करू नये. कारण साक्षरता आणि शिक्षण यामध्ये मूलभूत फरक आहे. नाव लिहिता येणे, एखादा मजकूर वाचता येणे किंवा प्राथमिक आकडेमोड करता येणे म्हणजे साक्षरता; पण त्या ज्ञानाचा वापर करून जीवनातील निर्णय घेता येणे, माहितीचे आकलन करता येणे, चुकीची माहिती ओळखता येणे, आर्थिक व्यवहार समजून घेता येणे आणि बदलत्या जगाशी जुळवून घेता येणे म्हणजे शिक्षण. आता महाराष्ट्रासमोरचा खरा प्रश्न 'किती जण साक्षर आहेत?' हा नसून 'किती जण सक्षम आहेत?' हा आहे. गेल्या दशकातील आकडेवारीकडे पाहिले तर बदल आशादायक आहे. एकूण साक्षरतेत वाढ झाली आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे महिला साक्षरतेचा वेग पुरुषांच्या तुलनेत अधिक राहिला आहे. पुरुष-महिला साक्षरतेतील अंतर कमी होणे हे केवळ आकडेवारीतील सुधारणा नाही; त्यामागे एका कुटुंबाची, एका पिढीची आणि अखेरीस संपूर्ण समाजाची मानसिकता बदलत असल्याचे दडलेले आहे. एक महिला शिकते तेव्हा केवळ एक व्यक्ती साक्षर होत नाही; संपूर्ण कुटुंबाच्या भविष्याची दिशा बदलते. शिक्षित महिला आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे अधिक गांभीर्याने पाहते, आरोग्यविषयक निर्णय अधिक समजूतदारपणे घेते, सरकारी योजनांचा लाभ घेण्यास सक्षम होते आणि आर्थिक-सामाजिक निर्णयप्रक्रियेत स्वतःचा आवाज निर्माण करते. त्यामुळे महिला साक्षरतेतील वाढ ही महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीची महत्त्वाची खूण आहे. मात्र, या यशाचा उत्सव साजरा करताना ग्रामीण-शहरी दरीकडे डोळेझाक करता येणार नाही. महानगरांमध्ये शिक्षणाच्या संधींची रेलचेल असताना दुर्गम ग्रामीण भागातील अनेक मुलांसाठी अजूनही चांगली शाळा, प्रशिक्षित शिक्षक, डिजिटल साधने आणि माध्यमिक शिक्षणाची उपलब्धता ही आव्हाने आहेत. शहरातील विद्यार्थ्याला उपलब्ध असलेले शिक्षण आणि दुर्गम गावातील विद्यार्थ्याला मिळणारे शिक्षण एकसारखे नसेल, तर साक्षरतेचा राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय सरासरी आकडा दिशाभूल करू शकतो. यापुढील काळात मुलांना शाळेत दाखल करण्यापेक्षा त्यांना शाळेत टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. आर्थिक अडचणी, पालकांची अस्थिर रोजगारस्थिती, घरातील जबाबदाऱ्या, शाळेचे अंतर आणि माध्यमिक शिक्षणासाठी उपलब्ध सुविधांचा अभाव यामुळे अनेक मुले शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतात. मुलगी असेल तर परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होते. बालविवाह, घरकाम आणि सामाजिक पूर्वग्रह यामुळे तिच्या शिक्षणाला खीळ बसू शकते. यामुळे 'प्रत्येक मूल शाळेत' या घोषणेपुढे 'प्रत्येक मूल शिकले पाहिजे' आणि 'प्रत्येक मुलाने शिक्षण पूर्ण केले पाहिजे' हे पुढचे लक्ष्य असले पाहिजे. आणखी एक मोठे आव्हान म्हणजे डिजिटल साक्षरता. आज बँकिंगपासून सरकारी योजनांपर्यंत आणि शिक्षणापासून आरोग्यसेवेपर्यंत अनेक सेवा ऑनलाइन झाल्या आहेत. मोबाईल हाताळता येणे म्हणजे डिजिटल साक्षरता नव्हे. ऑनलाइन फसवणूक ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे, डिजिटल आर्थिक व्यवहार समजून घेणे, विश्वासार्ह आणि खोटी माहिती यातील फरक ओळखणे ही कौशल्येही आता शिक्षणाचाच भाग झाली आहेत. म्हणूनच महाराष्ट्राने पुढील दशकासाठी साक्षरतेची व्याख्या अधिक व्यापक केली पाहिजे. वाचन, लेखन आणि अंकज्ञानासोबत डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता, माध्यम साक्षरता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक विचार या गोष्टी प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्नही तितकाच गंभीर आहे. वर्गात विद्यार्थी बसला आहे, शिक्षक उपस्थित आहेत आणि शाळेची इमारत उभी आहे, एवढ्यावर शिक्षणाची गुणवत्ता सिद्ध होत नाही. मुलाला वाचता येते का? त्याला वाचलेल्या मजकुराचा अर्थ समजतो का? तो स्वतःचे विचार मांडू शकतो का? मूलभूत गणिती समस्या सोडवू शकतो का? प्रश्न विचारण्याची आणि योग्य-अयोग्याचा विचार करण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होते का? या प्रश्नांची उत्तरेच महाराष्ट्राच्या शिक्षणाची खरी गुणवत्ता ठरवतील. साक्षरतेतील वाढ ही थांबण्याची जागा नाही; ती पुढे जाण्याची पायरी आहे. महाराष्ट्राने पुरुष-महिला दरी कमी केली, ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वाढविला, महिला साक्षरतेत प्रगती केली, या उपलब्धी नक्कीच महत्त्वाच्या आहेत. पण आता आकडेवारीच्या टाळ्यांमध्ये रमण्याऐवजी पुढील लक्ष्य निश्चित करण्याची वेळ आली आहे. ८७.३ टक्के साक्षरता हा अभिमानाचा आकडा आहे; पण उरलेली १२.७ टक्के माणसे कोण आहेत, कुठे आहेत आणि त्यांच्यापर्यंत शिक्षण का पोहोचलेले नाही, हा प्रशासनाने शोधला पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे साक्षर झालेल्या नागरिकांना खऱ्या अर्थाने सक्षम करण्याचे काम सुरू झाले पाहिजे. कारण शेवटी साक्षर समाज हा केवळ अक्षरे वाचणारा समाज नसतो; तो प्रश्न विचारणारा, विवेकाने निर्णय घेणारा, अन्यायाला विरोध करणारा आणि बदलत्या जगात आत्मविश्वासाने उभा राहणारा समाज असतो. महाराष्ट्राने साक्षरतेचा टप्पा गाठला आहे. आता त्याला 'शिकलेला, सक्षम आणि विवेकी महाराष्ट्र' घडविण्याचे आव्हान स्वीकारावे लागेल.

# स्वामीजींच्या भाषणाची प्रासंगिकता



स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो येथील १८९३ ला झालेल्या सर्वधर्मपरिषदेतील व्याख्यानास (आज) ११ सप्टेंबर रोजी १३३ वर्षे पूर्ण होत आहेत. स्वामी विवेकानंदांचे नाव घेतले की डोळ्यासमोर येते ते त्यांचे जागतिक सर्वधर्म परिषदेतील भाषण. या भाषणाने विवेकानंदांबरोबरच भारतालाही जगात एक वेगळी ओळख मिळवून दिली होती. विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात माझ्या बंधू आणि भगिनींनो अशी करताच उपस्थितांनी काही मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला. ज्यांनी संपूर्ण जगाला स्त्री आणि पुरुष या दोन वर्गात विभागले होते, त्यांच्यासाठी स्वामीजींचे हे संबोधन आश्चर्यकारक होते.

स्वामी विवेकानंदांनी प्रत्येक स्त्री आणि पुरूषांमध्ये भाऊ आणि बहिणीचे नाते दाखवून दिले होते. जगामध्ये कोणतेही असे भाषण नसेल, ज्याचा संबोधन दिवस वाढदिवसासारखा साजरा केला जात असेल. शिकागो मधील विवेकानंदांच्या या भाषणाने संपूर्ण जगामध्ये खळबळ उडवून दिली होती. यावरूनच या संस्मरणीय भाषणाचे ऐतिहासिक महत्व सिद्ध होते. संपूर्ण जगाला धर्मा चा मार्ग दाखविणाऱ्या, साधू-संतांची प्राचीन परंपरा असलेल्या देवभूमी भारताचे आपण प्रतिनिधित्व करत असल्याचे सांगून विवेकानंदांनी परिषदेत उपस्थित जगातील तमाम विद्वानांसमोर संस्कृत मधील श्लोकांचा दाखला देऊन त्यांचे अर्थ सांगत 'ज्याप्रमाणे वेगवेगळ्या नद्या वेगवेगळ्या ठिकाणी उगम पावून अखेरीस समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे माणूस आपल्या इच्छेनुसार वेगवेगळे मार्ग निवडतो. हे मार्ग सरळ असो की वाकडे-तिकडे, ते शेवटी भगवंतापर्यंतच जातात. हे स्पष्ट करून'जो माझ्यापर्यंत येतो, तो कसाही असो, मी त्याचा स्वीकार करतो.

कुणी कुठलाही मार्ग निवडो, अखेरीस माझ्यापर्यंतच येतो' असे गीतेतील श्लोकांच्या आधारे समजावले. प्राचीन परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या योगी स्वामी विवेकानंदांनी जगामध्ये शांती आणि विश्वबंधुत्व यांचा प्रसार केला. दया, परोपकार, करुणा, सद्भावना, बंधुत्व आदी सदाचारांना जीवनात उतरविले. त्यांनी कट्टरता, धर्मांधता, जातीवाद, अस्पृश्यता, अनिष्ट चालीरिती, गुलामगिरी या चा नेहमी विरोध केला. त्यांनी देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचे स्वप्न पहिले. हे सर्व त्यांनी त्यावेळी केले, ज्यावेळी एक धर्म दुसऱ्या धर्माला शत्रू समजत असे, एक देश दुसऱ्या देशाकडे संशयाने पाहत असे आणि साम्राज्यवादाचे राजकारण चालत असे. आज स्वामीजींच्या शिकागो येथील भाषणाच्या १३२ व्या वर्षानिमित्त जगाला पुन्हा एकदा शांततेची, बंधुत्वा-ची गरज निर्माण झाली असून त्याचबरोबर कट्टरतावाद संपविण्याची ही निकड भासू लागली आहे.

कमीत कमी शब्दांत भारतीय संस्कृती, भारत भूमी, परंपरा, संस्कृती आणि धर्म या गोष्टींचा जगाला परिचय करून देऊन स्वामीजींनी फक्त औषधच सांगितले नाही, तर आजारच न होण्याची उपाययोजनाही सांगितली. त्यांनी शिकागो मध्ये स्पष्ट केले की, जगात धर्माच्या नावाखालीच जास्त रक्त सांडले असून कट्टरताआणिसांप्रदायिकतेमुळेचजास्तरक्तपातझाले आहेत.

इतरांचा धर्म नष्ट करून आपल्या धर्माचा प्रचार होऊ शकत नाही. त्यांनी धर्मांधतेला विरोध करण्याचे आणि मानवतेला प्रतिष्ठा देण्याचे आवाहन संपूर्ण जगातील धर्मबांधवांना केले होते. म्हणूनच स्वामीजींच्या या भाषणाला पुन्हा एकदा पूर्ण ताकदीने जगासमोर ठेवण्याची आवश्यकता असून आज सुद्धा संपूर्ण जगाने स्वामीजींची शिकवण अवलंबीली पाहिजे, असे वाटते. जरी आज स्वामीजींच्या भाषणाला १३२ वर्षे लोटली असली तरी, आजही ते तितकेच मार्गदर्शक असून ते आजच्या परिस्थितीसाठीच तयार केले असावे असे वाटते. ही प्रासंगिकताच या भाषणा-चे महत्व अधोरेखित करते, त्याला अजरामर करते.

-प्रा. विजय कोष्टी,
कवठेमहांकाळ, जि.सांगली
मो. ९४२३८२९११७

# दुष्काळाचे सावट



ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. जून आणि जुलै महिन्यांपासूनच पावसाने ओढ दिल्याने ऑगस्टमध्ये तरी परिस्थिती सुधारेल, अशी आशा होती. मात्र ऑगस्ट महिन्यातही अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे राज्यातील शेती आणि पाणी साठ्याचे गणित बिघडले असून, दुष्काळाचे सावट हळूहळू अधिक गडद होताना दिसत आहे.

मान्सूनपूर्व पावसानेही शेतकऱ्यांची निराशा केली. पावसाळ्याच्या सुरुवातीला पुरेसा पाऊस न झाल्याने अनेक भागांत पेरण्यांना विलंब झाला. शेतकऱ्यांनी आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहिली आणि परिस्थितीचा अंदाज घेत पे-रणीचे नियोजन केले. मात्र पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले. आधीच महागाईच्या काळात बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च झा-लेला असताना पुन्हा पेरणी करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण आहे.

मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत पा-वसाची स्थिती चिंताजनक आहे. मराठवाड्यात पावसाची अनिश्चितता ही काही नवीन बाब नाही. मात्र यंदा सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. पुरेसा पाऊस न झाल्यामुळे कपाशी, सोयाबीन, धान, कडधान्ये यांसारखी प्रमुख पिके संकटात सापडली आहेत. पिके पाण्याअभावी कोम-जू लागल्याने बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

पावसाचा प्रश्न केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नाही. शेतीचे उत्पादन घटले तर त्याचा थेट परिणाम बाजारपेठेवर होतो. अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर कृषी उत्पादनांचा पुरवठा कमी झाला तर त्यांच्या किमती वाढण्याची शक्यता असते. त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांना सहन करावा लागतो. म हागाई वाढल्याने कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलम डते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याची चिंता ही प्रत्यक्षात संपूर्ण समाजाची चिंता आहे.

पावसाअभावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. राज्यातील धरणांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झाला नाही तर आगामी उन्हाळ्यात अनेक गावांना आणि शहरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने आतापासूनच पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारणाच्या कामांना गती आणि पाण्याची गळती रोखणे याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल.

पावसाअभावी जनावरांच्या चारा-पाण्याचाही प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला मोठे महत्त्व आहे. चारा उपलब्ध न झाल्यास पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहू शकते. परिस्थिती गंभीर झाल्यास शासनाला चारा छावण्या आणि इतर मदतयोजना सुरू कराव्या लागू शकतात. त्यामुळे संभाव्य संकटाची तीव्रता वाढण्यापूर्वीच प्रशासनाने तयारी करणे गरजेचे आहे.

दुष्काळाचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. शेतीचे उत्पादन चांगले झाले तर शेतकऱ्यांच्या हातात पैसा येतो आणि ग्रामीण भागातील बाजारपेठेला चालना मिळते. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढली की विविध व्यवसायांना त्याचा फायदा होतो. याउलट शेतीचे नुकसान झाले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट येते. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा किंवा इतर मदत देण्यासाठी सरकारला मोठा आर्थिक भार उचलावा लागतो. त्यामुळे दुष्काळ हा केवळ कृषी क्षेत्राचा प्रश्न नसून तो संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे.

हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यात पावसाची स्थिती काही प्रमाणात सुधारण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी केवळ अंदाजावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही. पावसाची अनिश्चितता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा ठेवतानाच प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी शासन आणि प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे वेळेत पंचनामे करणे, पीकविमा आणि शासकीय मदत मिळवून देणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे आणि आवश्यक त्या भागात जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे याला प्राधान्य दिले पाहिजे. संकट आल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकटाची शक्यता लक्षात घेऊन आधीच तयारी करणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसमोर हवामान बदलामुळे नवनवीन आव्हाने निर्माण होत आहेत. त्यामुळे दीर्घकालीन जलव्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण आणि पीकपद्धतीत आवश्यक बदल याकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. दरवर्षी पावसाची वाट पाहत संकटाचा सामना करण्याऐवजी पाण्याचे शाश्वत नियोजन करणे ही काळाची गरज आहे.

बळीराजाची नजर अजू-नही आकाशाकडे लागली आहे. उरलेल्या पावसाळ्यात दमदार पाऊस पडून पिकांना जी-वदान मिळावे, धरणे भरावीत आणि राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, अशी प्रत्येकाचीच अपेक्षा आहे. मात्र पाऊस पडेल या आशेवर हा-तावर हात ठेवून बसण्याची वेळ आता टळली पाहिजे. संभाव्य दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे आ-तापासूनच युद्धपातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण दुष्काळाची झळ प्रथम शेतकऱ्याला बसते; पण त्याची तीव्रता वाढली तर त्याचे परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावे लागतात. म्हणूनच 'पाऊस येईल तेव्हा पाहू' या मानसिकतेऐवजी 'पाऊस कमी पडला तरी संकटाला सामोरे जाण्याची तयारी आजपासून करू', अशी भूमिका शासनाने आणि समाजाने घेणे आवश्यक आहे.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे

# भाषण कलेत शब्दांचे महत्व



जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी शब्दांचे महत्व सांगताना शब्द हे शस्त्र आहेत असे म्हटले, म्हणून भाषण करते वेळेस एक एक शब्द तोलून मोजून बोलावे. वक्ता ज्यांना व्हायचे आहे.त्यांनी प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून उमजून घेऊन बोलावे.भोजन करताना भातात जर खडा लागला तर एखादा दात पडण्याची शक्यता असते. पण बोलताना जर शब्दाची गफलत झाली तर तोंडातील पूर्ण बत्तीशी बाहेर येते. म्हणून आपण सायकल शिकते वेळी पडत पडत शिकतो,तसेच जीभ चालवायची असताना ती ही सांभाळून चालवावी लागते. चुकून आपण भाषणात विद्यमान पत्नी,आई-वडील असे शब्द वापरले तर प्रचंड हास्य होते. कारण ते नाते आयुष्यभरासाठी असतात.त्यांचा कालावधी ठराविक नसतो, ज्यांचा कालावधी दोन,पाच वर्षाचा असतो त्याला विद्यमान म्हणून ओळखले जाते. शब्दाच्या जागा बदलू देऊ नका. उदा.तुम्हाला आम्हाला भोजनासाठी बोलायचं आहे यात कोणी कोणाला बोलविले आहे.

असे रंगतदार मजेशीर वाक्य असतात. तयारी केल्याशिवाय कधीही आपण भाषण करण्यास स्टेजवर जाऊ नये. जसे परीक्षेला जाताना अभ्यास करावा लागतो तर त्याचे फळ मिळते. पहिल्याच गायनाच्या तासिकेला कोणी गायक होत नाही. दररोज रियाज करावा लागतो. तेव्हा आपण उत्कृष्ट गायक होऊ शकतो 'वाहता मळा आणि गाता गळा' नेहमी भरून दिसतो. असे जाणकार लोक म्हण-तात

.भाषण कला ही दैवी शक्ती नसून तुम्ही केलेल्या प्रयत्नपूर्वक यशा-तून साध्य केली जाणारी उत्तम कला आहे.भाषण करते वेळेस तुम्हाला आत्मविश्वास महत्त्वाचा आहे. त्यामध्ये बोलणारे शब्द कोणाचीही भावना दुःखावणारे निंदा नालस्ती करणारे नसावेत.निखळ मनोरंजनातून प्रबोधन करणारे असावेत.तेव्हा समाजातील तुम्ही लोकप्रिय वक्ते होता.म्हणून भाषण करते वेळी शब्द महत्वाचे आहेत.

अमेरिकेतील शिकागो येथील धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदांनी माझ्या बंधू आणि भगिनींनो या शब्दामुळे जगात ते लोकप्रिय झाले. म्हणून भाषण कला ही म्हणावी तेवढी साधी सोपी नाही. बऱ्याच लोकांना सर्वात मोठे भय मृत्यूचे असते, पण काही लोकांना मृत्यूच्या भया पेक्षा भाषण करण्याची भीती जास्त वाटते. ज्या व्यक्तींना बोलण्याचा सराव नाही ते जर अचानक व्यासपीठावर गेले तर तळपाय, तळहात, थरथर कापतात शरीराला प्रचंड घाम येतो, हृदयाची धडकन वाढते, आपल्या तोंडातून साधा शब्द फुटत नाही, अशावेळी घशाला कोरड पडते,जीभ टाळूला चिकटते, माइक सुद्धा थरथरायला लागतो, म्हणून सराव केल्याशिवाय या गोष्टी आपल्याला करता येत नाही,

त् त् प् प् करत अडखळत बोलणं श्रोत्यांना ओळखू येते. म्हणून तुम्ही श्रोत्यांना बोलताना विचारपूर्वक बोलावे,मनातील भीती काढून टाका,आजही समाजामध्ये हजारो कीर्तनकार,व्याख्याते, प्रवचनकार, सम जसेवक, समाजसुधारक आहेत. परंतु काही वक्त्यांच्या कार्यक्रमाला भरपूर गर्दी होते ते त्यांची बोलण्याची कसब चांगली असते, बोलतात तर सर्वजण परंतु बोलण्या बोलण्यात फरक आहे ,म्हणून संभाषण साधण्याची ही एक कला आहे. कित्येक जनाला लोकांत खाली बसून फार मोठ्या फुशारक्या मारता येतात.

उभे राहून बोला म्हटलं की माफी मागतात.असे अनेक अनुभव आपल्याला सांगता येतात.भाषण हे बऱ्याच जणांसाठी करिअरचे क्षेत्र म्हणून असेल परंतु इतरा समोर ते आत्मविश्वासाने बोलू शकत नाहीत. वक्तृत्व चांगले असले की नेतृत्व करता येते. म्हणून आपल्या आयुष्यात भाषण कला ही काही जणांसाठी वरद-न आहे. म्हणून आजच्या तरुणांनी भाषण शिकण्याचे प्रशिक्षण घ्या, तेव्हा तुम्ही उत्तम वक्ते होऊ शकता. हजारो श्रोत्यांची मने जिंकता येतात. जेव्हा तुमचा अभ्यास पूर्ण भाषण होते. भाषणातील शब्द विषयाला अनुसरून असावेत. लोकांना समजण-ारे असावेत. तेव्हा तुम्ही अस्खलित भाषण करू शकता.अनेक भाषा एकत्रित करून भाषण करणं हे योग्य नाही.

व्याकरण हा भाषेचा अलंकार आहे. अधून मधून ते तुम्ही शोभून दिसण्या साठी भाषणात उखाणे, म्हणी सुविचार, आज्ञार्थी वाक्य, उद्गारार्थी वाक्य वापरू शकता. तेव्हा ते भाषण तुमचं प्रभावी होते.बोलणा-याचे हातुही विकतात पण न बोलणाऱ्याचे गहू सुद्धा विकत नाहीत, असे आपण ऐकतो म्हणून भाषण करणा-यांनी मुद्देसूद बोलावे. 'बालिश बहु बायकात बडबडला' असे आपण नेहमी ऐकत असतो. कारण त्याला पुरुष मंडळीम ध्ये स्पष्ट बोलता येत नाही. बऱ्याच वेळेस लोकप्रतिनिधी, कीर्तनकार, व्याख्याते यांच्याकडून बोलण्याच्या ओघात एखादा शब्द चुकीचा किंवा अनावधानाने निघून जातो त्या शब्दा-ची खोलवर माहिती नसते, त्यामुळे ते बोलून जातात परंतु ही घटना त्यांना सावरताना नाकी नऊ येतात. म्हणून भाषणातील शब्दही जपून वापरून भाषण करावे. रागाच्या भरात भाषणा-तून बोलू नये. ऐकणारे व्यक्ती ही फार हुशार असतात. आपण नंतर कितीही समजून सांगण्याचा प्रयत्न केला तरीही ते ऐकत नसतात. तोपर्यंत आदळ-आपट, मानवी पुतळे जाळणे, दंगाम स्ती करणे, रस्ता रोको अशा अनेक गोष्टी केल्या जातात. आणि प्रसारम ाध्यमासमोर बोलते वेळी मोजके बोलणे व अर्थपूर्ण वाक्य बोलणे हे फार महत्त्वाचे आहे. ध'चा मा'कधी होईल सांगता येत नाही. भाषण करते वेळेस वक्त्यांनी वेळेला महत्त्व द्यावे. आपले मुद्देसूद भाषण करण्यासाठी मुद्दे पाठांतर असावेत. आपण जास्त वेळ बोलतो तर इतरांना वेळ घेतल्यामुळे त्यांचे भाषण कदाचित रद्द सुद्धा केले जाते म्हणून खरा वक्ता तोच असतो, ज्यांना वेळेचे भान आणि श्रोत्यांच्या मानसिकतेची जाण असते त्यांना वक्ता म्हणावे.

तुम्ही एखाद्या व्यक्तीला 'विख्यात' म्हणण्याऐवजी 'कुख्यात' चुकून म्हटले तर सभागृहात सर्वत्र खसखस पिकते. म्हणून शब्दा-चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी अध्यक्षीय भाषण वाचून दाखवले जाते. कारण वाचलेले भाषण हे जगातील सर्वात रटाळ भाषण असते. म्हणून श्रोत्यांच्या डोळ्यात डोळे घालून धीटपणे अभ्यासपूर्वक भाषण करणाऱ्या व्यक्तीला वक्ता म्हणतात. म्हणून तुम्ही स्वतःची शैली स्वतः विकसित करा. इतरांची कॉपी करू नका. इतरांचे पाहून हातवा-रे करणे. विशिष्ट ठिकाणी पाणी पिणे, सारख रुमाल हातात धरून चेहरा पुसणे, एकाच बाजूला पाहून बोलणे हे भाषण कलेतील उणिवा आहेत. म्हणून आपण आपले बोलणे भाषणातील महत्त्वपूर्ण शब्द अलंकारिक वाक्य तेवढ्या जोशपूर्ण आवेशात बोलावे. छोट्या मुलाच्या आवाजातील वाक्य बोलताना चढ-उतार असावा. तेव्हा तुमचे भाषण प्रभावी होते. रस्ता जसा सारखाच नसतो ,तसे भाषण करते वेळी नेहमी चढ-उतार घ्यावे लागतात.तेव्हा भाषण कला ही तुम्हाला अवगत झाली असे समजावे, म्हणून आजच्या तरुणांनी भाषण कलेसाठी प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. त्याच बरोबर भाषण करताना आपल्या मनातील विचार सर्वांसमोर परखडपणे सादर करावेत. शब्द साठा हा बँकेतील पैशासारखा असतो, आपल्या नावावर बँकेत जेवढे पैसे आहेत. तेवढेच आपण काढून खर्च करू शकतो, बँकेतील पैसे वाढवायचे असतील तर तुम्ह-ला तुमचे उत्पन्न वाढवावे लागते, तसे तुम्हाला भाषणा-तील शब्दसाठा वाढवायचा असेल तर भरपूर पुस्तकांचे वाचन करूनच पुढे जाता येते, म्हणून वाचन चळवळ अतिशय महत्त्वाची आहे. त्यातून तुम्ही प्रभावी भाषण देऊ शकता म्हणून जिद्द असेल तर तुम्ही प्रभावी वक्ते होऊ शकता, प्राचार्य शिवाजीराव भोसले, हभप बाबा महाराज सातारकर, हभप न्यायाचार्य डॉ. नाम देव शास्त्री साहित्यिक पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, प्र. के. अत्रे, समाजसेविका सिंधुताई सपकाळ यासारखे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. ते त्यांच्या शुद्ध वाणीने प्रसिद्ध झाले आहेत.

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
अध्यक्ष : विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड

# नायगाव तालुक्यात पोळा सण उत्साहात

## बैलांची सजवून मिरवणूक; पारंपरिक पद्धतीने बैलांचे पूजन व 'लग्न' सोहळा



**नायगाव (प्रतिनिधी)** –शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा पोळा सण नायगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये उत्साहपूर्ण आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच शेतकरी कुटुंबांमध्ये पोळ्याची लगबग सुरू होती. बैलांना स्वच्छ धुऊन, रंगरंगोटी करून तसेच आकर्षक सजावट करण्यात आली. गळ्यात घुंगरू, शिंगांना रंग आणि अंगावर विविध प्रकारची सजावट करून बैलांना सजविण्यात आले होते.

पोळ्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी आपल्या बैलांचे विधिवत पूजन केले. त्यानंतर सजविलेल्या बैलांची गावातील प्रमुख मंदिराभोवती पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत शेतकरी, महिला, लहान मुले तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यामुळे गावागावांतील मंदिर परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिरवणुकीनंतर बैलांना घरी नेऊन त्यांचे पूजन करण्यात आले. पारंपरिक प्रथेनुसार बैलांचे 'लग्न' लावण्याचा सोहळाही पार पडला. बैलांच्या शिंगांना व अंगाला लावलेले रंग, गळ्यातील घुंगरांचे नाद आणि पारंपरिक वेशभूषेतील शेतकरी यामुळे ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडत होते.

पोळा हा केवळ सण नसून शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामात वर्षभर साथ देणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस मानला जातो. आधुनिक शेतीत यांत्रिकीकरण वाढले असले तरी ग्रामीण भागात पोळ्याची परंपरा आजही श्रद्धा आणि उत्साहाने जपली जात आहे. नायगाव तालुक्यातही यंदा विविध गावांमध्ये पोळा सण शांततेत आणि आनंदी वातावरणात पार पडला.

# ऐतिहासिक वारशाशी जोडणारा 'हेरिटेज वॉक' १२ सप्टेंबरला

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रतिभानिकेतन महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता बंदाघाट ते नावघाट या मार्गावर हेरिटेज वॉकचे आयोजन करण्यात आले आहे.

या हेरिटेज वॉकमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह नांदेड शहरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन इतिहास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

हेरिटेज वॉकचा प्रमुख उद्देश नांदेडच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व वास्तुशिल्पीय वारशाची ओळख करून देणे, त्याचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे हा आहे. तसेच नागरिकांमध्ये आपल्या शहराच्या समृद्ध वारशाबद्दल अभिमान व जाणीव निर्माण व्हावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

नांदेडच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाशी नागरिकांनी प्रत्यक्ष जोडले जावे आणि आपला वारसा, संस्कृती, ओळख हा संदेश समाजापर्यंत पोहोचावा यासाठी हेरिटेज वॉकमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर व इतिहास विभाग प्रमुख डॉ. राहुल वरवंटीकर यांनी केले आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी ऐकून घेतल्या नागरिकांच्या तक्रारी



**नांदेड (प्रतिनिधी)**–पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला.

लातूर जिल्हा भेटी दरम्यान, नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीद्वारे पोलीस, नागरिक यांच्यातील 'संवाद' मजबूत करून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस - जनता संबंध अधिक दृढ करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

लातूर जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. या दरम्यान, दुपारी ३ ते ५ या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण २३ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उपमहानिरीक्षक यांना सोपविले. यात मालमत्ताविषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, सायबर फसवणूक, पोलीस संरक्षण, कौटुंबिक वाद, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

याप्रसंगी, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.

# राजमाता जिजाऊ शैक्षणिक संकुलाद्वारे 'एफडीपी'चे आयोजन




**नांदेड (प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय ख्यातीचे माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ शैक्षणिक संकुलातील ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सभागृहात एकदिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. गणेश कदम यांनी दिली.

'एआय'च्या आगमनाने शिक्षण क्षेत्रातील कार्यपद्धतीत अमूलाग्र बदल झाले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि नवनवीन शैक्षणिक प्रणालींचा स्वीकार करणे ही काळाची गरज बनली आहे. बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये बदल न करणाऱ्यांना कालौघात मागे पडावे लागते. त्यामुळे आयदर यू 'रिपेअर' युवरसेल्फ ऑर सिस्टीम विल 'रिप्लेस' यू.! या बदलत्या वास्तवाची जाणीव शिक्षकांना करून देण्यासाठी अशा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामची गरज असल्याचे वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी सांगितले.

# आदिवासींच्या संघर्षाची प्रभावी कहाणी रंगमंचावर; 'जंगोम' नाटकाचा नांदेडमध्ये आज विशेष प्रयोग

**नांदेड (प्रतिनिधी)**– आदिवासींचा ब्रिटिशांविरुद्धचा संघर्ष तसेच देशविरोधी शक्तींविरुद्ध त्यांनी केलेल्या संघर्षाची प्रभावी कथानक असलेले 'जंगोम' या नाटकाचा विशेष प्रयोग नांदेडमध्ये आयोजित करण्यात आला आहे. स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेच्या आयोजनातून, महाराष्ट्र पोलीस आणि डॉ. दंदे फाउंडेशन यांच्या सहकार्याने हा प्रयोग होणार आहे. हेमेंदू रंगभूमी, नागपूर प्रस्तुत या नाटकातून इतिहास, संघर्ष आणि सामाजिक वास्तव यांचा नाट्यमय आविष्कार प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

आज शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८ वाजता डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे 'जंगोम' या नाटकाचा नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे. विशेष म्हणजे या प्रयोगासाठी




प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

'जंगोम' या नाटकाच्या माध्यमातून आदिवासी समाजाने ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभारलेला संघर्ष आणि देशविरोधी शक्तींविरुद्धचा लढा नाट्यमय पद्धतीने मांडण्यात आला आहे. जंगल, आदिवासी जीवन, संघर्ष, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामाजिक वास्तव या विविध पैलूंना नाटकाच्या कथानकातून स्पर्श करण्यात आला असून, या विषयाची मांडणी प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारी ठरणार आहे.

नाटकाचे लेखक प्रवीण पांडुरंगशोभा खापरे असून दिग्दर्शन शुभम निकम यांनी केले आहे. हेमेंदू रंगभूमी, नागपूरच्या माध्यमातून हा प्रयोग नांदेडच्या रसिकांसमोर सादर केला जाणार आहे. नाट्यप्रयोगासाठी प्रवेश विनामूल्य असल्याने नांदेड शहरासह परिसरातील नाट्यरसिक, विद्यार्थी, कलाप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलावंतांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र पोलीस आणि स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेडचे अध्यक्ष दिनेश कवडे यांनी केले आहे.

# ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना अत्याधुनिक रोपवाटिका तंत्रज्ञानाचे धडे

**हदगाव (प्रतिनिधी)**–ऊस उत्पादनाचा दर्जा व उत्पादकता वाढविण्यासोबतच लागवड खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिकाधिक आर्थिक फायदा मिळावा या उद्देशाने शिखर साखर कारखाना लि., वाकोडी व श्री सुभाष शुगर प्रा. लि., हडसणी यांच्या वतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय ऊस रोपवाटिका प्रशिक्षण शिबिरासाठी ३१ ऊस उत्पादक शेतकरी रवाना झाले आहेत.

दोन्ही कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना निरोगी व दर्जेदार ऊस रोपे उपलब्ध करून देणे, तसेच रोपवाटिकेच्या माध्यमातून कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, हा या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे.

सध्या संबंधित भागात ऊस रोपवाटिकांची संख्या कमी असल्याने शेतकऱ्यांना लांब अंतरावरून रोपे आणावी लागतात. परिणामी रोपांच्या किमतीसोबतच वाहतूक खर्चही वाढतो. ही अडचण दूर करण्यासाठी स्थानिक पातळीवरच दर्जेदार रोपवाटिका उभारण्यास प्रोत्साहन देण्याचा निर्णय दोन्ही कारखान्यांनी घेतला आहे.

या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने ऊस रोपवाटिका उभारणी, निरोगी रोपांची निर्मिती आणि कमी खर्चात अधिक ऊस उत्पादनाचे तंत्रज्ञान अवगत होणार आहे. तसेच रोपवाटिका उभारणीमुळे कार्यक्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. याशिवाय उच्च प्रतीची व कमी खर्चातील ऊस रोपे स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होऊन ऊस उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

याबाबत कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख व कार्यकारी संचालक सुशीलकुमार सुभाषराव देशमुख यांनी माहिती दिली.

# प्रतिभा निकेतन महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रतिभा निकेतन महाविद्यालयात प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी होते. प्रमुख मार्गदर्शक व सत्कारमूर्ती म्हणून प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ममता मालविया, तर विशेष उपस्थिती म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. श्रीमंत राऊत, डॉ. जयश्री देशमुख आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. महाविद्यालयाच्या परंपरेनुसार या शैक्षणिक वर्षात सेवामुक्त होत असलेले प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. ममता मालविया यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी उपस्थित सर्व प्राध्यापकांना गुलाबपुष्प देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरलेल्या विद्यार्थी मनोगतामध्ये शालिनी वाघमारे, संस्कृती व प्रगती या विद्यार्थिनींनी शिक्षकांचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. विविध मानसिकतेच्या विद्यार्थ्यांना समजून घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देत प्रत्येक विद्यार्थ्याला यशस्वी जीवनाचा मूलमंत्र देण्याचे कार्य शिक्षक करतात, असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ममता मालविया म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता अनुभवातून समाजात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले व्यावहारिक ज्ञान आत्मसात करावे. नवीन शैक्षणिक धोरणात अपेक्षित असलेली विविध कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा, असे त्यांनी प्रतिपादन केले.

डॉ. श्रीमंत राऊत यांनी विद्यार्थिनींच्या मनोगताचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपला मौल्यवान वेळ विविध अभ्यासक्रमपूरक उपक्रम, ग्रंथवाचन आणि सामाजिक जागृतीच्या कार्यात सहभागी होऊन जीवन घडविण्यासाठी उपयोगात आणावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या महान कार्याचा व तत्त्वज्ञानाचा परिचय करून दिला.

अध्यक्षीय समारोपात डॉ. दिलीप स्वामी यांनी विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचा आदर करावा, तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना माहिती आणि ज्ञान यातील फरक समजून घेऊन ज्ञानार्जनाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. बालाजी यशवंतकर यांनी केले, तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. स्वाती तांडे यांनी केले. कार्यक्रमास डॉ. पी. नीलकंठ राव, डॉ. राहुल वरवंटीकर, डॉ. मारोती लुटे, डॉ. गजानन वाघमारे, डॉ. दीपक वाघमारे, डॉ. संदीप शिंदे, डॉ. रविंद्र लाटकर, प्रा. सोपान थळंगे, प्रा. विलास घोंगडे, प्रा. ओमप्रकाश चिंचलपल्ले, प्रा. नंदकिशोर गायकवाड यांच्यासह महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित होते.

# स्व. गंगाधरराव पांपटवार जीवन गौरव पुरस्कार जाहीर



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वर्गीय गंगाधरराव पांपटवार जयंती महोत्सव समिती, टीचर्स क्लब रुग्णालय व स्वर्गीय गंगाधरराव पांपटवार वैद्यकीय सहकारी संस्थेच्या आठव्या वर्धापन दिनाच्या औचित्याने जीवन गौरव पुरस्कार घोषित करण्यात आले असून, शिक्षण, साहित्य, आरोग्य, प्रसारमाध्यम, प्रशासकीय आदी जीवन गौरव पुरस्कार देण्यात येत आहेत. पुरस्काराचे हे आठवे वर्ष आहे.

या वर्षीचा साहित्य क्षेत्रातील पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक प्रा. मथुताई सावंत, आरोग्य क्षेत्रातील पुरस्कार डॉ. सुरेश खुरसाळे, (रयत रुग्ण मंडळ नांदेड), प्रसारमाध्यम क्षेत्रातील पुरस्कार संजीव कुलकर्णी, प्रशासकीय क्षेत्रातील पुरस्कार डॉ. अजय कदम, शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार प्राचार्य डॉ.विजय शिवराम पवार यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत स्व. गंगाधरराव पांपटवार सहकारी वैद्यकीय सहकारी संस्थेचे अध्यक्ष डॉ.गजानन पांपटवार यांनी दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी दिली. या वेळी स्वागताध्यक्ष प्रा. डी. बी. जांभरूनकर, बालाजी पांपटवार यांची उपस्थिती होती. व्यंकटेश अर्बन श्रीनगर नांदेड येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पुरस्कार जाहीर करण्यात आले.

कुसुम सभागृह नांदेड येथे दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत फ. मु. शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर यांची प्रमुख वक्ते म्हणून उपस्थिती राहणार आहे.

# जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)**– आगामी सण, उत्सव, आंदोलने, मोर्चे तसेच विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी किरण अंबेकर यांनी हा आदेश जारी केला असून दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे.

या कालावधीत नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या आसपास पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे.

# दुसऱ्याच्या कल्याणात सुख पाहणारेच खरे संत असतात -नारायण महाराज




**किनवट (प्रतिनिधी)**– खरे संत हे वर्णनाने नव्हे, तर वर्तनाने समाधानी होतात. दुसऱ्याच्या कल्याणात सुख पाहणारेच खरे संत असतात, असे मत हभप नारायण महाराज माधापूरकर यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील मांडवा येथे श्रावण मास सोमवार एकादशी पर्वकाळनिमित्त तुळशीमाला धारण कार्यक्रम व कीर्तन सोहळ्याचे आयोजन दि. ७ रोजी करण्यात आले होते. यावेळी माधापूरकर महाराज बोलत होते. ते पुढे म्हणाले की, प्रत्येक जीवाला व्यसनमुक्त करून त्यांचा संसार सुखाचा करणे तसेच विषयमुक्त करून परमार्थ सिद्धीस नेण्यासाठी संतांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. संत हे कधीही भेद, भीड व भय धरून बोलत नसतात, त्यांची वाणी राजापासून रंकापर्यंत एकच असते. त्यांची वाणी सर्वोपयोगी व सर्वांची शुभकामना करणारी व्यापक व सर्वाधिकार असणारी असते. व्यसनमुक्त माणसाचा संसार सुखाचा होतो व विषयमुक्त माणसाचा परमार्थ सुखाचा होतो, हे दोन्ही साध्य करण्यासाठी तुळशीमाला धारण उपक्रम मागील तीन वर्षापासून मांडवा गावामध्ये चालू आहे. याही वर्षी अनेक महिला, पुरुष, युवक व युवती यांनी तुळशीमाला धारण करून महाराजांचा आशीर्वाद घेतला.

याप्रसंगी अनिरुद्ध केंद्रे यांनी गावात महाराजांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या उपक्रमाची माहिती सांगितली. या कीर्तन सोहळ्यास आ. भीमराव केराम, हभप रघुनाथ महाराज कराड, हभप निवृत्ती महाराज जल्देकर तेलंगणा तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील भाविक भक्त महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पान १ वरून...

**भोकरजवळ मॅजिक ऑटो...**

(३१, भोकर), सोमनाथ मारोती येळणे (३०, जामळज, ता. हदगाव) यांच्यासह एकाचा समावेश आहे. त्यांना तातडीने भोकर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश भंडरवार आणि पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. अवैध प्रवासी वाहतुकीमुळेच ही दुर्घटना घडली का, याची चौकशी आता पोलीस करीत आहेत. अपघात घडल्यानंतर या मार्गावरील वाहतूक जवळपास एक तासापेक्षा अधिक काळ खोळंबली होती.

**दीड महिन्यांचा पावसाचा...**

पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून, पिकांना पाण्याची तीव्र गरज भासत आहे. सोयाबीन, तूर, कापूस आणि हळद यासह विविध खरीप पिकांवर या पावसाच्या खंडाचा गंभीर परिणाम झाला आहे. बहुतांश भागांत पिके सुकण्यास सुरुवात झाली असून, उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने परिस्थिती अधिकच चिंताजनक बनली आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पर्जन्यमान, पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यांचे तातडीने सर्वेक्षण करून नांदेड जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करावा. तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार तातडीने मदत व आवश्यक सवलती उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आ. अमरनाथ राजूरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनातून केली आहे. या शिष्टमंडळात महापौर कविता मुळे, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते महेश कनकदंडे, माजी महापौर जयश्री पावडे, ॲड. निलेश पावडे आदींचा समावेश होता.

# विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात शिक्षक दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात शिक्षक दिन अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या प्राध्यापकांच्या कष्टांबद्दल, मार्गदर्शनाबद्दल आणि प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



कार्यक्रमाची सुरुवात संकुलाचे संचालक डॉ. राजेश टाले आणि इतर प्राध्यापकांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. संपूर्ण सभागृह सुंदर फुलांच्या रांगोळ्या आणि शिक्षकांसाठी लिहिलेल्या सुंदर संदेशांनी सजवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी संकुलातील शिक्षकांप्रती आदर व्यक्त करणाऱ्या विविध स्वरचित कवितांचे वाचन केले.

याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांचीही उपस्थिती लाभली. सर्व शिक्षकांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी यावर्षी एक विशेष पाऊल उचलले. शिक्षकांच्या हस्ते संकुल परिसरात विविध प्रकारच्या वनस्पतींचे रोपण करण्यात आले. शिक्षक जसे विद्यार्थ्यांचे जीवन घडवतात आणि त्यांना वाढवतात, तसेच हे लावलेले झाडही भविष्यात सावली आणि फळे देतील, अशी भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक विचाराचे मनापासून कौतुक केले.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरु अशोक महाजन आणि सर्व शिक्षकवृंद डॉ. संगीता माकोने, डॉ. भास्कर दवणे, डॉ. संतोष देवसरकर, डॉ. अविनाश पुयड, डॉ. जी. कृष्णा चैतन्या, डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे, डॉ. ओमप्रकाश येमुल, सर्व विद्यार्थी यांनी मिळून वृक्षारोपण केले. याशिवाय, विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांना भगवद्गीता या पवित्र ग्रंथाची मराठी आवृत्ती भेट म्हणून दिली.

या प्रसंगी बोलताना संकुलाचे संचालक डॉ. राजेश टाले यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले आणि त्यांचे आभार मानले. ते म्हणाले, शिक्षण देणे म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणे नव्हे, तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणे आहे.

# अंतर्मन

# गणेशोत्सव : पुजेसाठी लागणारे साहित्य...

## मंडप सजावटीपासून नैवेद्यापर्यंत सर्व तयारी एका ठिकाणी...

**गणपतीच्या आगमनापूर्वी घरातील पूजा, सजावट आणि नैवेद्यासाठी लागणारे सर्व साहित्य तयार ठेवणे आवश्यक आहे. ऐनवेळी एखादी वस्तू राहून जाऊ नये, यासाठी गणेश चतुर्थीच्या पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची यादी आधीच तयार करून खरेदी करून ठेवता येते.**

» गणेश चतुर्थी पूजेसाठी लागणारे साहित्य : लाकडी पाट किंवा चौरंग, लाल किंवा पिवळे कापड, पूजेचे आसन, श्रीगणेशाची मूर्ती, दुर्वा, झेंडूची फुले, चमेलीची फुले, जास्वंदीची फुले, विड्याची पाने, सुपारी, केळीची पाने, इतर ताजी फुले व हार.

» आरतीसाठी लागणारे साहित्य : पितळी दिवा, शुद्ध देशी गायीचे तूप, कापूर, कापसाच्या वाती, अगरबत्ती, आगपेटी, घंटा, शंख, हवनासाठी लागणारे साहित्य, आरतीचे ताट.

» गणेश मंडपाच्या सजावटीसाठी : गणपतीची प्रतिष्ठापना ज्या ठिकाणी केली जाणार आहे, त्या ठिकाणची सजावटही उत्सवाचा महत्त्वाचा भाग असते. त्यासाठीचे साहित्य : आंब्याच्या पानांचे तोरण, ताजी फुले, फुलांच्या माळा, आंब्याची पाने, सजावटीचे साहित्य.

» गणेशाला नैवेद्य दाखवण्यासाठी : श्रीगणेशाला नैवेद्य दाखवताना पारंपरिक पदार्थांना विशेष महत्त्व आहे. यासाठी पंचामृत, दूध, दही, साखर, मध, गंगाजल, मोदक, गूळ, विविध फळे, बताशे, सुकामेवा, बुंदीचे लाडू, बेसनाचे लाडू.

» कलश स्थापनेसाठी लागणारे साहित्य : गणेश प्रतिष्ठापनेसोबत कलशाची स्थापना केली जात असल्यास लागणारे साहित्य : तांब्याचा किंवा पितळी कलश, आंब्याची पाने (पंचपल्लव), नारळ, कलावा (रक्षासूत्र), कुंकू, हळद, जानवे, अक्षता, चंदन, गंगाजल, दुर्वा.


### या गोष्टी लक्षात ठेवा...

गणपतीची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी पूजा करण्याचे ठिकाण स्वच्छ करून घ्यावे. शक्य असल्यास ईशान्य दिशा (ईशान कोण) स्वच्छ आणि नीटनेटकी ठेवावी. गणेशमूर्ती ठेवण्यासाठी लाकडी पाट किंवा चौरंग ठेवून त्यावर पिवळे किंवा लाल कापड अंथरावे. त्यावर अक्षतांच्या साहाय्याने अष्टदल रेखाटून त्यावर श्रीगणेशाची मूर्ती ठेवावी. मूर्तीची प्रतिष्ठापना करताना धार्मिक पद्धतीनुसार मूर्तीचे मुख वस्त्राने झाकण्याची प्रथा काही ठिकाणी पाळली जाते. त्यानंतर विधिवत पूजा करून मूर्तीचे मुख उघडले जाते. धातूची गणेशमूर्ती असल्यास पंचामृताने मूर्तीचे स्नान घालता येते. मात्र शाडूची किंवा मातीची मूर्ती असल्यास थेट पाण्याने स्नान घालण्याऐवजी पाण्याचे हलके शिंपडणे योग्य मानले जाते, जेणेकरून मूर्तीचे नुकसान होणार नाही. गणेश चतुर्थीच्या दिवशी पूजा निर्विघ्नपणे पार पडावी, यासाठी आवश्यक साहित्याची खरेदी आणि तयारी आदल्या दिवशीच करून ठेवणे सोयीचे ठरते. श्रद्धा, भक्ती आणि स्वच्छतेने केलेली गणेशपूजा हीच या उत्सवाची खरी शोभा आहे.

# अमावस्येला जन्मलेले बाळ असते रहस्यमयी...

## जाणून घ्या स्वभाव अन् अमावस्येचा प्रभाव कमी करण्याचे उपाय...

**हिंदू धर्मशास्त्रात तिथींना विशेष महत्त्व दिले जाते. एखाद्या व्यक्तीचा जन्म ज्या तिथीला होतो, त्या तिथीचा त्याच्या स्वभावावर आणि जीवनावर काही प्रमाणात प्रभाव पडतो, अशी ज्योतिषशास्त्रीय मान्यता आहे. अमावस्येला जन्मलेल्या व्यक्तींबाबतही विविध धार्मिक आणि ज्योतिषीय समजुती प्रचलित आहेत. अमावस्येच्या दिवशी सूर्य आणि चंद्र एकाच राशीत असल्याचे ज्योतिषशास्त्रात मानले जाते. त्यामुळे या तिथीला जन्मलेल्या व्यक्तींमध्ये काही वेगळे गुण असतात, अशी मान्यता आहे. त्या व्यक्ती मेहनती, गंभीर आणि परिस्थितीचा सामना करणाऱ्या असू शकतात. तसेच त्यांच्यात तीव्र अंतर्ज्ञानशक्ती असल्याचेही ज्योतिषीय मत आहे. मात्र, हे सर्व दावे ज्योतिषीय आणि धार्मिक मान्यतांवर आधारित असून त्यांना वैज्ञानिक आधार असल्याचे सिद्ध झालेले नाही.**



### ‘सर्पशीर्ष दोषा’बाबत ज्योतिषीय मान्यता

ज्योतिषीय मान्यतेनुसार, एखाद्या बालकाचा जन्म अमावस्या तिथीला झाला आणि त्यावेळी अनुराधा नक्षत्राचा तिसरा किंवा चौथा चरण सुरू असेल, तर त्याला ‘सर्पशीर्ष दोष’ असल्याचे काही ज्योतिषीय मतप्रवाहांमध्ये सांगितले जाते. अशा स्थितीमुळे जीवनात संघर्ष, अडथळे किंवा विविध अडचणी येऊ शकतात, अशी मान्यता आहे. मात्र, कुंडलीतील इतर ग्रहस्थिती आणि योगांचा विचार केल्याशिवाय याबाबत निश्चित निष्कर्ष काढता येत नाही.



### अमावस्येचा प्रभाव संतुलित करण्यासाठी उपाय

» अमावस्येला जन्मलेल्या व्यक्तींनी काही धार्मिक उपाय करावेत, अशी ज्योतिषीय परंपरेत मान्यता आहे. त्यामध्ये काही उपाय सांगितले जातात...

» अमावस्येच्या दिवशी पितरांच्या स्मरणार्थ दानधर्म आणि धार्मिक कार्य करावे.

» भगवान शिवांची उपासना करावी आणि शिवमंत्राचा जप करावा.

» ध्यान आणि मनःशांतीसाठी साधना करावी.

» अमावस्येच्या दिवशी मांसाहार, मद्यपान आणि तामसिक आहार टाळावा, अशी धार्मिक मान्यता आहे.

» शक्यतो क्रोध, वादविवाद आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा.

### सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा

अमावस्येला जन्म झाला म्हणून व्यक्तीच्या आयुष्यात नेहमी अडचणीच येतात, असे मानणे योग्य नाही. व्यक्तीचा स्वभाव आणि जीवनप्रवास अनेक घटकांवर अवलंबून असतो. ज्योतिषीय मान्यतेनुसार, अमावस्येला जन्मलेल्या व्यक्तींमध्ये असलेली अंतर्ज्ञानशक्ती, चिकाटी आणि संघर्ष करण्याची क्षमता योग्य दिशेने वापरल्यास त्यांना जीवनात चांगले यश मिळू शकते. त्यामुळे जन्मतिथीची भीती न बाळगता शिस्त, सकारात्मक विचार, मेहनत आणि योग्य निर्णयक्षमता यांना महत्त्व देणे अधिक उपयुक्त ठरते.

### व्यक्तिमत्त्व काहीसे गूढ

अमावस्येला जन्मलेल्या व्यक्तींमध्ये तीव्र अंतर्ज्ञानशक्ती असल्याचे ज्योतिषशास्त्रात मानले जाते. समोरची व्यक्ती काही न सांगताही तिच्या मनातील भावना किंवा परिस्थितीचा अंदाज घेण्याची क्षमता त्यांच्यात असू शकते, अशी मान्यता आहे. या व्यक्ती सहसा शांत आणि गंभीर स्वभावाच्या असतात. त्या आपल्या मनातील प्रत्येक गोष्ट सहजपणे इतरांसमोर व्यक्त करत नाहीत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व इतरांना काहीसे गूढ वाटू शकते.

### आव्हानांचा धैर्याने सामना करतात

ज्योतिषीय मान्यतेनुसार, अमावस्येला जन्मलेल्या व्यक्ती मेहनती असतात. त्यांच्या जीवनात काही संघर्ष आणि अडचणी येऊ शकतात. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही त्या खचून न जाता मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. आयुष्यात आलेल्या अनुभवांमुळे अशा व्यक्तींमध्ये परिपक्वता आणि समजूतदारपणा अधिक विकसित होतो, असे मानले जाते. कितीही अडचणी आल्या तरी त्यांचा सामना करण्याची मानसिक ताकद त्यांच्यात असते.

### व्यक्तिमत्त्वावर अमावस्येचा प्रभाव


ज्योतिषशास्त्रात चंद्राला मन आणि भावनांचा कारक मानले जाते. अमावस्येला चंद्राचे दर्शन होत नसल्यामुळे या दिवशी जन्मलेल्या व्यक्तींच्या मानसिक स्थितीबाबत काही विशिष्ट ज्योतिषीय मते आहेत. काही वेळा अशा व्यक्तींमध्ये अतिविचार करण्याची प्रवृत्ती दिसू शकते. त्यामुळे आत्मविश्वास कमी होणे, मनात अस्वस्थता निर्माण होणे किंवा एखाद्या विषयाबाबत संभ्रम राहणे, अशी स्थिती उद्भवू शकते, असे ज्योतिषीय मत आहे.

### इतरांच्या भावना सहज ओळखतात

अमावस्येला जन्मलेल्या व्यक्ती आपल्या भावना सहजपणे व्यक्त करत नसल्या तरी इतरांच्या भावना समजून घेण्यात संवेदनशील असतात, असे ज्योतिषीय मत आहे. समोरची व्यक्ती आपले दुःख किंवा समस्या व्यक्त करत नसली, तरी तिच्या वागण्या-बोलण्यातून परिस्थिती ओळखण्याची क्षमता अशा व्यक्तींमध्ये असते, अशी मान्यता आहे. काही ज्योतिषीय ग्रंथांमध्ये अमावस्येला जन्मलेल्या व्यक्तींना कौटुंबिक, आर्थिक किंवा इतर प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असे नमूद केले जाते. मात्र, जन्माच्या वेळी असलेले नक्षत्र, ग्रहस्थिती आणि कुंडलीतील इतर घटक यांचाही विचार केला जातो. त्यामुळे केवळ अमावस्या तिथीवरून व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्याचे भाकीत करणे योग्य ठरत नाही.



# गणेश चतुर्थीला चंद्रदर्शन का करू नये? जाणून घ्या पौराणिक कथा...



**यंदा १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थी साजरी केली जाणार आहे. भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षातील चतुर्थीला गणेश चतुर्थी साजरी केली जाते. या दिवशी भगवान गणेशाची विधिवत पूजा आणि प्रतिष्ठापना केली जाते. मात्र, या तिथीला चंद्रदर्शन करू नये, अशी धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे गणेश चतुर्थीला ‘कलंक चतुर्थी’ असेही म्हटले जाते. पौराणिक कथेनुसार, गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन घेतल्यास व्यक्तीवर खोटा आरोप किंवा कलंक येण्याची शक्यता असते. यामागे भगवान गणेश आणि चंद्रदेव यांच्याशी संबंधित एक कथा सांगितली जाते.**

### भगवान श्रीकृष्णांनाही लागला होता मिथ्या दोष?

पौराणिक कथेनुसार, एकदा भगवान श्रीकृष्णांनीही चतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन घेतले होते. त्यानंतर त्यांच्यावर स्यमंतक मणी चोरी केल्याचा खोटा आरोप करण्यात आला. या कथेमुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन न करण्याच्या धार्मिक मान्यतेला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन टाळावे, अशी परंपरा अनेक भाविक पाळतात.

### गणेश चतुर्थीला चंद्रदर्शन का करू नये?

पौराणिक कथेनुसार, एकदा भगवान गणेश हातात अनेक लाडू घेऊन मूषकावर स्वार होऊन जात होते. त्याच वेळी त्यांचा तोल गेला आणि ते खाली पडले. हे पाहून चंद्रदेव हसू लागले. चंद्रदेवांनी केलेल्या उपहासामुळे भगवान गणेश संतप्त झाले. त्यांना चंद्रदेवांचे वर्तन अपमानास्पद वाटले. त्यामुळे गणेशांनी चंद्रदेवांना क्षीण होण्याचा शाप दिला. या शापामुळे चंद्राचे तेज दिवसेंदिवस कमी होऊ लागले आणि त्यांचे अस्तित्व धोक्यात आले. यानंतर सर्व देवतांनी चंद्रदेवांना भगवान शिवांची आराधना करण्याचा सल्ला दिला. चंद्रदेवांनी समुद्रकिनारी शिवलिंगाची स्थापना करून भगवान शिवांची कठोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवान शिव प्रकट झाले आणि त्यांनी चंद्रदेवांना मृत्यूच्या संकटातून वाचवले. यानंतर चंद्रदेवांनी भगवान गणेशांची क्षमा मागितली. गणेशांनी चंद्रदेवांचा शाप पूर्णपणे मागे घेता येणार नसल्याचे सांगितले. मात्र, शापाची तीव्रता कमी करत चंद्रदेवांना एक वरदान दिले. त्यानुसार, चंद्राचा आकार काही काळ कमी होत जाईल आणि त्यानंतर पुन्हा वाढू लागेल. त्यामुळे चंद्राच्या कला कमी-जास्त होत राहतील आणि पौर्णिमेला चंद्र पूर्णत्वाला येईल. मात्र, भगवान गणेशांनी भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी चंद्रदर्शन करणाऱ्याला ‘मिथ्या दोष’ लागू शकतो, अशी मान्यता दिली. म्हणजेच त्या व्यक्तीवर खोटा आरोप किंवा कलंक येण्याची शक्यता असते.

### म्हणून ‘कलंक चतुर्थी’ म्हणतात...

ज्या दिवशी भगवान गणेशांनी चंद्रदेवांना शाप दिला, तो दिवस भाद्रपद शुक्ल पक्षातील चतुर्थी असल्याचे या कथेत सांगितले जाते. त्यामुळे या दिवशी चंद्रदर्शन करणे निषिद्ध मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्राचे दर्शन घेतल्यास व्यक्तीवर खोटा आरोप, अपकीर्ती किंवा कलंक येण्याची शक्यता असते. म्हणूनच गणेश चतुर्थीला ‘कलंक चतुर्थी’ असेही संबोधले जाते.

### धार्मिक मान्यता म्हणूनच पाहावे...



चंद्रदर्शनासंदर्भातील हा नियम पौराणिक आणि धार्मिक मान्यतांवर आधारित आहे. त्यामुळे त्याकडे श्रद्धेच्या दृष्टीने पाहिले जाते. गणेश चतुर्थीच्या दिवशी भगवान गणेशाची भक्तिभावाने पूजा करणे आणि त्यांच्या आशीर्वादाची प्रार्थना करणे, ही या उत्सवाची प्रमुख परंपरा आहे.

# विश्वकर्मा जयंती कधी आहे?

## जाणून घ्या तारीख, पूजा मुहूर्त अन् पूजाविधी...

**भगवान विश्वकर्मा यांना देवतांचे शिल्पकार, वास्तुकार आणि निर्माणकलेचे जनक मानले जाते. हिंदू धर्मात भगवान विश्वकर्मा यांना विशेष महत्त्व आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त कारखाने, उद्योग, कार्यशाळा आणि विविध आस्थापनांमध्ये यंत्रे, अवजारे तसेच वाहनांची पूजा केली जाते. पौराणिक मान्यतेनुसार, भगवान विश्वकर्मा यांनी देवतांसाठी विविध अस्त्रे-शस्त्रे, भव्य राजवाडे आणि दिव्य वास्तूंची निर्मिती केली होती. त्यामुळे त्यांना निर्माणकला आणि अभियांत्रिकीचे अधिष्ठाता मानले जाते. विश्वकर्मा जयंतीच्या निमित्ताने यंत्रे आणि कामाच्या साधनांची पूजा करून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.**



विश्वकर्मा पूजा दरवर्षी कन्या संक्रांतीच्या दिवशी साजरी केली जाते. सूर्याचा कन्या राशीत प्रवेश झाल्यानंतर कन्या संक्रांती सुरू होते. यंदा सूर्य १७ सप्टेंबर २०२६ रोजी कन्या राशीत प्रवेश करणार आहे. त्यामुळे याच दिवशी विश्वकर्मा जयंती आणि विश्वकर्मा पूजा साजरी केली जाणार आहे. विश्वकर्मा पूजेसाठी दुपारचा काळ विशेष शुभ मानला जातो.

### पूजेसाठी पुढील चौघडिये शुभ

» चल चौघडिया : सकाळी १० वाजून ४३ मिनिटे ते दुपारी १२ वाजून १६ मिनिटे - सामान्य मुहूर्त.


» लाभ चौघडिया : दुपारी १२ वाजून १६ मिनिटे ते १ वाजून ४८ मिनिटे - उत्तम मुहूर्त.

» अमृत चौघडिया : दुपारी १ वाजून ४८ मिनिटे ते ३ वाजून २० मिनिटे - उत्तम मुहूर्त.

» या कालावधीतील कोणत्याही शुभ मुहूर्तावर भगवान विश्वकर्मांची पूजा करता येईल.

### विश्वकर्मा पूजाविधी

विश्वकर्मा जयंतीच्या दिवशी पूजा करण्यापूर्वी पूजा स्थळ तसेच कार्यस्थळ स्वच्छ करून घ्यावे. त्यानंतर भगवान विश्वकर्मांच्या प्रतिमेची किंवा मूर्तीची विधिवत स्थापना करावी. यानंतर कलशाची स्थापना करून हातात अक्षता आणि पाणी घेऊन पूजेचा संकल्प करावा. भगवान विश्वकर्मांना जल, अक्षता, कुंकू, फुले आणि मिठाई अर्पण करावी. पूजेनंतर आपल्या कार्यस्थळावरील यंत्रे, अवजारे, उपकरणे तसेच वाहनांचीही पूजा करावी. कारखाने, कार्यशाळा आणि उद्योगांमध्ये या पूजेला विशेष महत्त्व आहे. पूजेच्या शेवटी भगवान विश्वकर्मांची कथा वाचावी किंवा ऐकावी आणि आरती करावी. आरतीनंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करावे. त्यानंतरच स्वतः प्रसाद ग्रहण करावा.



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# हायटेक जुगार अड्ड्यावर डीआयजी उमाप यांच्या पथकाची धाड, नोटा मोजण्याच्या मशीनही जप्त!

- ऑनलाईन पेमेंटसाठी स्वाईप मशीनचीही होती सोय!
- रोख रक्कम, वाहने व साहित्यासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या मोघा शिवारातील रानमाळा क्लबवर छापा टाकून कारवाई केली आहे. श्री गुरुनाथ क्रीडा मंडळ द्वारा संचलित, 'रायडर क्लब' या नावाने हा मनोरंजन क्लब सुरू होता.

सदर मनोरंजन क्लबवर महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या राज्यातून दररोज सुमारे २०० वाहनांतून लोक जुगार खेळण्यासाठी येत असल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार, आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक त्यांनी देवणीकडे कारवाईसाठी रवाना केले होते.

रात्री ९.३० वाजता पोलीस पथक सदर क्लबवर तपासणीकामी पोहोचले असता मोठ्या प्रमाणावर लोक जुगार खेळत होते. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागताच त्यांनी तेथून पळ काढला. सदर क्लबमधून बाहेर



पडण्यासाठी अनेक वाटा असल्याने अंधाराचा फायदा घेऊन जुगारी घटनास्थळावरून पळून गेले.

सदर कारवाईत पोलिसांनी संबंधित ठिकाणावरून १ लाख ४ हजार ९०० रुपयांची रोकड व ११ लाख ५० हजार रुपये किंमतीची ४ चारचाकी वाहने, कॉईन ठेवण्यासाठी वापरले जाणारे ३ स्टीलचे बॉक्स, प्लास्टीकचे कॉईन इत्यादी असा एकूण १२ लाख ६९ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### नोटा मोजण्याच्या मशीनसह तीन स्वाईप मशीन जप्त

सदर कारवाईदरम्यान क्लबमध्ये एका नोटा मोजण्याच्या मशीनसह 'भारत पे' कंपनीच्या तीन स्वाईप मशीन मिळून आल्या. यावरून सदर ठिकाणी रोख रकमेसह ऑनलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणावर पैशाची उलाढाल होत असल्याचे आढळून आले असून, सदर मशीनच्या तपासणीतून यात नक्की किती व्यवहार होत होता हे स्पष्ट होणार आहे.

### जुगाऱ्यांच्या मद्य सेवनासाठी स्वतंत्र व्यवस्था

सदर क्लबवर येणाऱ्या जुगाऱ्यांना मद्य सेवनाची देखील त्याच ठिकाणी व्यवस्था करून देण्यात आली होती. कारवाईदरम्यान, क्लबमध्ये दारूने भरलेले पाच ग्लास देखील पोलिसांना आढळून आले.

नमूद प्रकरणात सदर क्लबचे अध्यक्ष प्रमोद विद्यासागर धुमाळे रा. शिरूर अनंतपाळ व एम. रामाराव, रा. हैदराबाद यांचे विरुद्ध देवणी पोलीस ठाणे येथे गु. र.न. ३१३/२०२६ कलम ४, ५ मुंबई जुगार कायद्यासह कलम ६८ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, तसेच कलम २२३ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. गणेश राठोड, पोहेकॉ. गजानन डवरे इत्यादींनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# पोळ्याच्या दिवशीच विजेचा शॉक लागून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

## शेतातील खांबावरील वीजतार तुटून पडली; डोणगाव खुर्दमधील घटना, महावितरणच्या कारभारावर नागरिकांचा संताप

**शंकरनगर (प्रतिनिधी)** –बिलोली तालुक्यातील डोणगाव खुर्द येथे शेतातील विजेच्या खांबावरील तार तुटून शेतात पडल्याने त्या तारेचा स्पर्श होऊन मधुकर गंगाधर पाटील कानोले (वय ४०) यांचा विजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना शेतकऱ्यांच्या पोळा सणाच्या दिवशी सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे डोणगाव खुर्द परिसरावर शोककळा पसरली असून, पोळ्याच्या सणावर दुःखाचे सावट आले.



मिळालेल्या माहितीनुसार मधुकर कानोले हे नेहमीप्रमाणे सकाळी गावाजवळील आपल्या शेताकडे गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे कुटुंबियांनी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु संपर्क होऊ शकला नाही. यानंतर कुटुंबियांनी शेताकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना कानोले यांचा शोध घेण्याची विनंती केली.

शेजारील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात जाऊन पाहिले असता विजेच्या खांबावरील तार तुटून शेतात पडल्याचे निदर्शनास आले. त्याच तारेच्या संपर्कात आल्याने मधुकर कानोले यांना विजेचा जबर धक्का बसल्याचे दिसून आले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. वीजपुरवठा बंद करून कानोले यांना तारेपासून बाजूला करण्यात आले. त्यानंतर त्यांना तातडीने नायगाव येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

सायंकाळी सुमारे पाच वाजता डोणगाव खुर्द येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

शेतातील वीजतार तुटून पडण्यासारखी परिस्थिती वेळेत लक्षात घेऊन दुरुस्ती करण्यात आली असती, तर हा जीवघेणा प्रकार टाळता आला असता, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. बिलोली तालुक्यातील अनेक गावांमध्ये वीजवाहिन्या व तारा लोंबकळत असून, त्यांची वेळेवर पाहणी व दुरुस्ती केली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीविताशी संबंधित असलेल्या वीजवाहिन्यांची तातडीने तपासणी करून धोकादायक तारा व खांबांची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# बोगस ग्राहक पाठवून पोलिसांचा सापळा; वसरणीत वेश्याव्यवसाय उघड

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील अनैतिक मानवी व्यापाराला आळा घालण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत पोलिसांनी वसरणी येथे बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या कुंटणखान्यावर छापा टाकून दोन पीडित महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणी ४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांच्या नेतृत्वात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष



आणि स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई गुरुवार दि. १० सप्टेंबर रोजी केली. वसरणी परिसरातील एका पांढऱ्या इमारतीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती.

पोलिसांनी पंचांसह बोगस ग्राहकाच्या माध्यमातून खात्री केली. बोगस ग्राहकाला रोख रक्कम देऊन महिलेच्या मोबाईलवर संपर्क करण्यास सांगितले असता, तिने लातूर फाटा येथे बोलावले. त्यानंतर पंचांसह संशयित ठिकाणी प्रवेश करून छापा टाकण्यात आला.

या कारवाईत नांदेड व गुजरात येथील दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. चौकशीत आरोपींची नावे निष्पन्न झाली असून, त्यात लक्ष्मीबाई संजय जाधव (वय ४८, रा. सूर्यनगर), सचिन कसबे (हॉटेल मालक), अल्ताफ नबीसाब शेख (वय २४, रा. वडेपुरी, ता. लोहा), तुषार सुरेश बुद्धेवाड (वय ३४, रा. सुनीलनगर, नांदेड) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून मोबाईल, रोख रक्कम व वेश्यागमनाचे साहित्य असा एकूण २० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# बोगस डॉक्टरांना बिनबोभाट औषध पुरवठा; घाऊक विक्रेत्यांमुळे करोडोंचा जीएसटी बुडतो -केमिस्टांचा आरोप

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यात अवैध औषध व्यवसायावर कारवाईचा बडगा उगारला जात असताना, सर्व नियम आणि कडक कारवाई फक्त किरकोळ (रिटेल) औषध विक्रेत्यांवरच का केली जाते, असा संतप्त सवाल जिल्ह्यातील केमिस्टांनी उपस्थित केला आहे.

किरकोळ विक्रेत्यांवर एका दिवसात दुकान बंद करण्याची कारवाई केली जात असताना त्यांना पुरवठा करणारे घाऊक (होलसेल) विक्रेते मात्र मोकाट असल्याचा आरोप होत आहे. जिल्ह्यातील अवैध व्यवसायाला मुख्यत्वे काही ठोक विक्रेते जबाबदार असून, अनुभव नसलेले लोक या व्यवसायात शिरले आहेत. डॉक्टरांना होणारा शेड्यूल 'क' आणि नार्कोटिक्स औषधांचा बेसुमार पुरवठा रोखण्याची गरज असल्याचे केमिस्टांचे म्हणणे आहे.

या विषयावर वरिष्ठ फार्मासिस्ट प्रसाद वाघमोडे म्हणाले, औषधी निरीक्षकांचे पथक किरकोळ विक्रेत्यांना त्रास देत असताना अवैध व्यवसायाला कारणीभूत असलेले घाऊक विक्रेते मूग गिळून गप्प आहेत. जिल्ह्यात अनेक बोगस डॉक्टर, होमिओपॅथी, इलेक्ट्रोपॅथी, कंपाउंडर, सिस्टर यांना थेट होलसेलर औषध पुरवठा करतात. बंद झालेल्या मेडिकलच्या नावानेही औषधे दिली जातात.

२०१३ च्या कायद्यानुसार डिस्पो सिरिंज, आयव्ही सेट सारख्या सर्जिकल साहित्याला बिलच नसते, त्यामुळे सरकारचा करोडो रुपयांचा जीएसटी बुडतो. एफडीने घाऊक विक्रेत्यांची कसून तपासणी केल्यास कर बुडवे आणि शेड्यूल-क चा गैरवापर करणारे अनेकजण उघडे पडतील.

# श्रीमती रजनी राजूरकर यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड येथील जुन्या पिढीच्या नामवंत लेखिका श्रीमती रजनी राजूरकर यांचे वृद्धापकाळाने दि. ८ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८३ वर्षांच्या होत्या. नांदेड शहरातील शास्त्रीनगर येथे त्यांचे बराच काळ वास्तव्य होते. नांदेड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्यांनी मुख्याध्यापिका म्हणून कार्य केले. नांदेड जिल्हा परिषदेने त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविले होते.



# जळबा कदम यांचे निधन

**कंधार (प्रतिनिधी)** – येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा ज्येष्ठ नागरिक जळबा अर्जुनराव कदम (वय ९२) यांचे गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी सातच्या सुमारास निधन झाले. जळबा कदम यांच्या पार्थिव देहावर गुरुवारी रात्री साडेआठच्या दरम्यान अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व चार मुली असा परिवार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे (मजीपा) सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता सुरेंद्रकुमार कदम यांचे ते काका होत.



# प्रा. डॉ. गणंजय कहाळेकर यांना महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार २०२२ (प्राध्यापक संवर्ग) जाहीर झाले असून, नांदेड जिल्ह्यातील संस्कृतचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर हे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.



मुखेड येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात संस्कृत विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. डॉ. कहाळेकर यांना तब्बल २९ वर्षांच्या अध्यापनाचा अनुभव आहे. संस्कृतच्या प्रचार-प्रसारासाठी विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी ६४ उपक्रमांचे आयोजन केले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणे व समित्यांवर त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# विठ्ठल फुके यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील विठ्ठल फुके यांचे दि. ९ सप्टेंबर निधन झाले आहे.



विठ्ठल फुके यांचे गुरुवार, दि. ९ सप्टेंबर रोजी निधन झाले असून, दि. १० सप्टेंबर रोजी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले असून, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, नातू, नात असा परिवार आहे.

# सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जमाव नियंत्रण ते दगडफेकीवर प्रतिकार; शहर पोलिसांचा दंगा नियंत्रणाचा सराव

**नांदेड (प्रतिनिधी)**–आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तत्काळ नियंत्रण मिळवता यावे, यासाठी नांदेड शहर पोलिसांनी गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी अशोकनगर परिसरात दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेतली.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने हा सराव घेण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर वेंजने यांच्या देखरेखीखाली झालेल्या या सरावात भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे,



शिवाजीनगरचे राजेश पुरी, विमानतळचे रामदास शेंडगे, वजिराबादचे अजित कुंभार यांच्यासह १२ सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि ६० पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

पोलीस मुख्यालयातील प्रशिक्षक हनुमंत इंगोले आणि विनोद माने यांनी दंगा नियंत्रणाची कार्यपद्धती, जमावाला पांगवण्याचे तंत्र, संरक्षक साधनांचा वापर आणि विविध परिस्थितीत करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

सरावादरम्यान संभाव्य जमाव नियंत्रण, दगडफेक, जाळपोळ किंवा हिंसक आंदोलन रोखणे, पोलीस दलाची योग्य मांडणी, लाठीचार्ज, अश्रूधुराचा वापर आणि परिस्थितीनुसार करावयाच्या कारवाईचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले.

आगामी काळात गर्दीची ठिकाणे, मिरवणूक मार्ग आणि संवेदनशील भागात कायदा- सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पूर्णपणे सज्ज असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. सर्व सण-उत्सव शांततेत आणि सामाजिक सलोखा राखून पार पाडण्यासाठी पोलीस कटिबद्ध आहेत. नांदेडकरांनीही शहराच्या शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी घ्यावी व सण- उत्सव उत्साहात साजरे करावे आणि जिल्हा व पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

# पळसा गाव तीन दिवसांपासून अंधारात



**नांदेड (प्रतिनिधी)**– हदगाव तालुक्यातील पळसा येथील लोकसंख्या सहा हजारांहून अधिक आहे. कमकुवत झालेल्या विद्युत तारा व गावातील दोन विद्युत डीपी निकामी झाल्या असल्याने मागील चार दिवसांपासून ग्रामस्थांना अंधाराचा सामना करावा लागत आहे.

गावासाठी असलेले दोन कर्मचारी एक हदगाव तर दुसरा नांदेडवरुन ये-जा करत असून, कर्मचाऱ्यासह अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने वारंवार तोंडी तक्रारी करूनही वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने पर्यायी व्यवस्था करावी यासाठी संतप्त ग्रामस्थांनी ७ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत बरडशेवाळा विद्युत उपकेंद्रात ठाण मांडून बसले होते. कर्मचारी येत नाही तोपर्यंत घराकडे जात नाही असा पवित्रा घेतल्याने विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या तोंडी आश्वासनानंतर माघार घेऊन तीन दिवस अंधारात ठेवले असल्याने पळसा गावकऱ्यांकडून विद्युत वितरण कंपनीकडून रोष व्यक्त होत आहे.

गावातील विद्युत वाहिन्या व तारा जुन्या आणि कमकुवत झाल्याने वारंवार बिघाड होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वीजपुरवठा खंडित असल्याने घरगुती कामांसह विद्यार्थ्यांचा अभ्यास, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. वरिष्ठांनी दखल घेऊन कमकुवत वीज तारा बदलून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी पळसा ग्रामस्थांनी केली आहे.

# दुष्काळाच्या सावटातही पोळा सण उत्साहात साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या ३२ गावांतील ३९ ठिकाणी शेतकरी राजाने आपल्या सर्जा राजाची जल्लोषात ढोलताशांच्या गजरात व गावातील हनुमान मंदिरात प्रदक्षिणा घातली. तसेच अनेक गावांत सामुदायिक मंगलाष्टके गाऊन लग्न सोहळा, आरती व विधीवत साहित्याची पूजा करून पोळा साजरा करण्यात आला.

यावेळी गावातील ग्रामपंचायतचे आजी माजी सरपंच, सदस्य, प्रतिष्ठित नागरीक, पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष यांच्यासह महिला नागरीक मोठ्या संख्येने उपस्थिती होत्या. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनेक गावात पाऊस न पडल्याने दुष्काळाचे सावट दिसून आले.

बैलपोळा सणाच्या निमित्ताने १० सप्टेंबर रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील तुप्पा, जवाहरनगर, भायेगाव, वाजेगाव, काकांडी, नागापूर राहेगाव, वांगी, पुणेगाव, वाडीपुयड, वसरणी, असर्जन, वाघाळा,



असदवन, पिंपळगाव यांसह जवळपास ३२ गावांतील ३९ ठिकाणी विधीवत पूजन करून सामुदायिक लग्न सोहळा, महाआरतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या चाळीस-पन्नास दिवसांपासून पावसाने दांडी मारल्याने शेतकरी संकटात आला असून, अनेक गावात दुष्काळाचे सावट दिसून आले.

नांदेड तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक चळवळीत अग्रेसर असलेल्या बाभुळगाव येथे सामुदायिक लग्न सोहळा सायंकाळी पाच वाजता संपन्न झाला. यावेळी आरतीनंतर मानकरी संभाजी पांचाळ यांच्या हस्ते तोरण तोडण्यात आले. प्रारंभी गावातील शेतकरी बांधवांनी आपल्या सर्जा राजा यांची सजावट करून गावातील हनुमान मंदिर येथे आणून प्रदक्षिणा घालण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सामुदायिक लग्न सोहळा संपन्न झाला. गावातील महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सरपंच पुंडलिक मस्के, तंटामुक्त अध्यक्ष सूर्यभान पाटील मोरे, प्रभाकर पाटील मोरे, अशोक मोरे, काळेश्वर मस्के, बालाजी पाटील मस्के, आनंदराव मस्के, सूर्यभान मोरे, पोलीस पाटील संतोष मोरे, मधुकर मस्के, सेवानिवृत्त शिक्षक एस. बी. मोरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भायेगाव येथेही उत्साहात बैलपोळा सण साजरा करण्यात आला. यावेळी तोरण तोडण्याचा मान शामराव पाटील खोसडे मुकदम यांच्याकडे होता. यावेळी गावातील अनेक शेतकऱ्यांनी बैलजोडीचे हनुमान मंदिर येथे विधीवत पूजन केले.

यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर, अशोक पाटील कोचार, उपसरपंच बालाजी कोल्हे, विठ्ठल पाटील खोसडे, पोलीस पाटील प्रतिनिधी शिवानंद खोसडे, शामराव पाटील खोसडे, तिरूपती पाटील कोल्हे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जवाहरनगर तुप्पा येथील हनुमान मंदिर येथे सायंकाळी ५ वाजता पोळा सणाच्या निमित्ताने बैलजोडी सामुदायिक विवाह सोहळा ढोल ताशांच्या गजरात पार पडला. यावेळी बबनराव कदम, दत्ता पाटील कदम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com